प्रबोधन
गोरेगांव

# आठवा वार्षिक अहवाल

१९७९ - ८०

ज्ञान
प्रबोधन
कला सेवा
गोरेगांव

# 'प्रबोधन' गोरेगाव

## आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा

**'प्रबोधन गोरेगाव'** या संस्थेची आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. २७ सप्टेंबर १९८० रोजी रात्रौ ९ वा.** विद्युत, महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-६२ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. सन १९७९-८० चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद ( हिशेब तपासनीसाच्या अहवालासह ) वाचून मंजूर करणे.

३. नवीन वर्षाकरिता (१९८०-८१) घटनेच्या कलम ७ (ई) प्रमाणे अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा)

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून
**विजय नाडकर्णी**
कार्याध्यक्ष

गोरेगाव, मुंबई–६२.
दिनांक १२ सप्टेंबर १९८०

**विलास देवरुखकर**
प्रमुख कार्यवाह

---

**विशेष सूचना :** १) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ 'विद्युत', लो. टिळक नगर रस्ता क्र. ४, गोरेगाव (प.) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २२-९-८० ते २४-९-८० पर्यंत रोज रात्रौ ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येतील.

२) कोणाहि सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या लेखी दि. २६-९-८० पूर्वी कार्याध्यक्षांकडे सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

४) निवडणूकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. २४-९-८० पूर्वी 'विद्युत', लो. टिळक नगर रस्ता क्र. ४, गोरेगाव [प.], येथे रात्रौ ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# 'प्रबोधन' गोरेगाव

# आठवा वार्षिक अहवाल १९७९-८०

प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या कार्याचा दि. १ जुलै १९७९ ते ३० जून १९८० या आठव्या वर्षाचा अहवाल आणि हिशेब पत्रके सादर करताना कार्यकारी मंडळास अतिशय आनंद होत आहे.

**कार्यकारी मंडळ आणि सभा :** अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण १२ सभा घेण्यात आल्या. सभांना सरासरी ९ सदस्य उपस्थित होते.

**उपक्रम आणि कार्यक्रम :** संस्थेने सुरू केलेले सर्व लोकोपयोगी उपक्रम या आठव्या वर्षीही सातत्याने व पूर्वीच्याच योजकतेने आयोजित केले गेले. या रचनात्मक उपक्रमाच्या जोडीनेच काही करमणूकप्रधान कार्यक्रमही सादर केले गेले. मात्र विधायक भरीव कार्याला प्राधान्य देण्याची परंपरा कसोशीने पाळण्यात आली.

## प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा ( वर्ष ७ वे )

या चढाओढीच्या काळात वक्तृत्वकला अंगी असणे हे मोठे वरदानच. तथापि या महत्वपूर्ण विषयात विद्यार्थी वर्गाला आवश्यक ते प्रोत्साहन व सहाय्य लाभत नाही हे जाणून 'प्रबोधन' ने १९७३ साली सुरु केलेल्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेला आज एक प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले आहे. या वर्षीही बृहन्मुंबई प्रमाणेच महाराष्ट्रातील दूरदूरचे स्पर्धक वक्तृत्व स्पर्धेत हिरीरीने उतरले होते. दि. २३ व ३० सप्टेंबर रोजी पाटकर महाविद्यालयातील सभागृहात विद्यार्थी, पालक, शिक्षक व अन्य रसिकांच्या भरगच्च उपस्थितीत या स्पर्धा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. शालेय गटाची सांघिक विजयाची ' कै. कृष्णाजी गोविंद सैतवडेकर स्मृती प्रबोधन फिरती ढाल ' ठाण्याच्या सरस्वती विद्यामंदीरने पटकाविली तर महाविद्यालयीन गटात हाच बहुमान मुलुंडच्या वाणिज्य महाविद्यालयाने संपादन करुन ' कै. तरूलताबाई गुप्ते स्मृती प्रबोधन फिरती ढाल ' मिळविली स्पर्धेचे परीक्षण प्रा. राम म्हात्रे, श्री. नारायण आठवले व श्रीमती गिरीजा कीर यानी केले होते. मुंबईचे माजी महापौर श्री. सुधीर जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## एकांकिका स्पर्धा [वर्ष ८ वे]

हौशी नाट्य संस्थांच्या वर्तुळात ' प्रबोधन ' एकांकिका स्पर्धेला एक कौतुकाचे तसेच मानाचे स्थान आहे. मुंबई प्रमाणेच इतरही शहरातील असंख्य नाट्यसंस्था या स्पर्धेत भाग घेण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. मात्र आर्थिक व वेळेच्या मर्यादेमुळे तसेच सुसज्ज नाट्यगृहाच्या अभावी संस्थेला सर्वच इच्छुक संस्थाना स्पर्धेत प्रवेश देता येत नाही. या वर्षीही संस्थेकडे आलेल्या अनेक अर्जामधून १८ एकांकिकांची निवड स्पर्धेसाठी करण्यात आली. त्यातून **उदयकला केंद्र** या संस्थेच्या **नको नको म्हणताना** या एकांकिकेस 'कै. केशवराव दाते चषक ' व रोख रु. ५००/– देऊन सर्वोत्कृष्ट प्रयोगाबद्दल गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण श्री. सुरेश पिप्रोडिया, श्री. बाबा परुळेकर व श्री. अनंत घोगळे यांनी केले. नाट्यदर्पण'चे संपादक श्री. सुधीर दामले यानी विजेत्यांना पारितोषीके प्रदान करून होतकरू नाट्यकलाकारांना उपयुक्त मार्मिक मार्गदर्शन केले.

## 'घरात हसरे तारे' : एक प्रेक्षक-प्रिय नाटक

एकांकिका स्पर्धेला जोडून मुंबई मराठी साहित्य सं निर्मित 'घरात हसरे तारे ' या प्रा. रमेश कोटस्थ

लिखित नाटकाचा अप्रतिम प्रयोग ५ फेब्रुवारी ८० रोजी आयोजित केला होता. 'एक सर्वांगसुंदर नाटक' असे या कलाकृतीचे वर्णन करावे लागेल. संस्थेच्या सभासदांनी व अन्य नाट्यप्रेमिकानी मुक्तकंठाने प्रशंसा केलेल्या या नाटकानंतर प्रायोगिक रंगभूमिवरील नवनवे देखणे प्रयोग यापुढे गोरेगावकरांसाठी सातत्याने आयोजित करण्याचा संस्थेचा मनोदय आहे.

## एस. एस. सी. व्याख्यानमाला [वर्ष ८ वे]

एस. एस. सी. च्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणा-प्रमाणेच अन्य अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देणारी ही व्याख्यानमाला म्हणजे गोरेगांवच्या परिसरातील विद्यार्थ्यांना एक सहाय्यकर्ती योजनाच होय. महत्त्वाच्या विषयांच्या बरोबरीनेच नामवंत शिक्षक श्री. एस. वाय. गोडबोले यानी सर्वसाधारण मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना उपयुक्त ज्ञान दिले. दि. २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी पर्यंत चाललेल्या या ज्ञानसत्राची उपयुक्तता एस. एस. सी. परीक्षेनंतर विद्यार्थी व पालकांनी मुद्दाम येऊन व्यक्त केलेल्या आभारावरूनच सिद्ध झाली.

## आठवे वर्धापनदिन संमेलन

दि. १७ मार्च १९८० रोजी गुढीपाडव्याला संस्थेचा आठवा वर्धापन दिन मोठ्या धामधुमीत आयोजित करण्यात आला होता. संस्थेच्या सभासदांसाठी म्हणून खास **'रथचक्र'** हे नवीन नाटक विलेपार्ले येथील मा. दीनानाथ नाट्यगृहात दाखविण्यात आले. मार्च १०वी एस. एस. सी. परीक्षेत गोरेगावातील शाळामधून सर्व प्रथम अलेल्या वंदना खंडाळेकर या विद्यार्थिनीला रोख रु. ५१/- पारितोषिक देऊन या बहुमानाबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला नगरसेवक डॉ. रमेश प्रभू हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## प्रबोधन व्याख्यानमाला [वर्ष ८ वे]

'लोकरंजनातून लोकशिक्षण' या स्वरूपात सादर करण्यात येत असलेल्या व्याख्यान मालेचे हे आठवे वर्ष या वर्षी श्री. वसंत पोतदार, वाचस्पति विष्णुजी क्षीरसागर व प्रा. सु. ग. शेवडे यांची विविध विषयांवरील व्याख्याने या मालिकेत दि. १ मे ते ८ मे ८० पर्यंत सादर करण्यात आली.

## प्रबोधन बालवाचनालय

प्रबोधन बालवाचनालयाच्या एकूण ५ शाखांमधून जवळ जवळ ६०० शालेय विद्यार्थी लाभ घेत आहेत बालवाचकांसाठी विनामूल्य चालविण्यात येणाऱ्या उपक्रमाची उत्तरोत्तर विकास होत आहे ही विशेष समाधानाची बाब आहे. या सर्व शाखांमध्ये मिळून एकूण १४०० पुस्तकांचा संग्रह आहे.

## प्रबोधन बालवाडी

सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करीत असताना समाजाच्या अविकसीत घटकाला उपयुक्त ठरणारे उपक्रम आयोजित करण्याचे संस्थेचे धोरण आहेच. त्यानुसार जवाहर नगर ( गोरेगाव पश्चिम ) येथील झोपडपट्टी विभागातील बालवाडी शाखेच्या बरोबरच तीन डोंगरी गोरेगाव (प.) येथेही एक विनामूल्य बालवाडी सुरू झाली आहे. या बालवाडीतील ६०-७० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येत आहे. गुढीपाडव्याला व स्वातंत्र्यदिनी बालकाना खाऊची भेट संस्था देते.

## प्रबोधन क्रीडा महोत्सव (वर्ष २ रे)

मागील वर्षी संस्थेने आपला एक महत्वाकांक्षी उपक्रम सुरू केला. वांद्रे ते दहिसर या विभागातील माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा

आयोजित करून संस्थेने क्रीडा विश्वात पदार्पण केले. या दुसऱ्या वर्षी ७, ८ व ९ डिसेंबर १९७९ या तीन दिवशी कबड्डी, खो–खो, ॲथलेटिक्स व लोकनृत्य या विभागामध्ये १५०० हून अधिक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी आपले क्रीडा नैपुण्य दाखविले. सिद्धार्थ नगरचे क्रीडांगण खास या स्पर्धांसाठी समतल करून घेण्यात आले भव्य करंडकांबरोबरच यशस्वी विजेत्यांना पदके व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. या महोत्सवासाठी विविध क्रीडा संघटनांनी व आदर्श विद्यालय या संस्थेने विशेष सहाय्य दिले. क्रीडा रसिकांच्या प्रचंड उपस्थितीमुळे या क्रीडा स्पर्धांना खरेखुरे महोत्सवी स्वरूप प्राप्त झाले.

बक्षिस समारंभाला मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष **श्री. भगवती श्रॉफ** हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**धन्यवाद !**

संस्थेने आजवर केलेल्या कार्यात असंख्य हित-चिंतकांचा, सभासदांचा व कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकार, अन्य संस्था यांच्या सक्रीय सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले. संस्थेचे सरकारमान्य हिशेब तपासनीस मेसर्स एस. एस. नायक आणि कं. व अंतर्गत हिशेबतपासनीस श्री. रामचंद्र जोशी यानी बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालीकेने यावर्षी संस्थेला रु. २०,००० चे अनुदान दिले. या बहुमोल उदार मदतीबद्दल संस्था महानगरपालीकेची व अनुदान समितीवरील नगरसेवक सदस्यांची अत्यंत ऋणी आहे. महाराष्ट्र शासनाचीही संस्था आभारी आहे. अशा सर्व संबंधीतांचा हाच लोभ सदैव कायम राहिल असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र

**कार्यकारी मंडळ १९७९–८०**
**प्रबोधन गोरेगाव**

# 'प्रबोधन' गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था ( Regn. No. Bom 49/72 GB BSD )
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था ( Regn. No. F 2502 Bom )

अध्यक्ष : *श्री. निळकंठ ज. सावंत*

उपाध्यक्ष : *श्री. प्रभाकर न. मोडक* डी. एम्. ओ., डि. ओ. ओ.
*श्री. शरद गुप्ते* बी. ए.

## कार्यकारी मंडळ

( १९७९–८० )

कार्याध्यक्ष : *श्री. विजय नाडकर्णी* बी. ई. (ऑ) सिव्हील

प्रमुख कार्यवाह : ,, *विलास देवरुखकर* बी. एससी (ऑ.)

सह कार्यवाह : ,, *मनोहर अदवानकर* एम. एससी.
,, *सुरेश चव्हाण* बी. ए.

कोषाध्यक्ष : ,, *महादेव खानोलकर*

—: सभासद :—

*श्री. पद्माकर देसाई* बी. एससी. (ऑ.)
,, *सुरेश सैतवडेकर*
,, *गणपतराव सारंग* जी. डी. आर्ट
,, *दिलीप साळवी* बी. एससी. (ऑ.)
,, *सुरेश माईणकर*

*श्री. सुभाष देसाई*
,, *दिनकर माळवणकर*
,, *सुभाष पारकर*
,, *रघुनाथ जंगम*
,, *विकास रेळे* बी. ए. एल. एल. बी.

अंतर्गत हिशेब तपासनीस
*श्री. रामचंद्र जोशी* बी. कॉम.

सनदी लेखापाल
*मे. एस. एस. नायक आणि कं*

*कार्यालय :*
'विद्युत' लोकमान्य टिळक नगर रस्ता क्र. ४,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (प.),
मुंबई-४०० ०६२.

*संपर्क :*
*रंगसेवा*
फिल्मिस्तान जवळ, स्वामी विवेकानंद मार्ग,
गोरेगाव (प.), मुंबई-४०० ०६२.
दूरध्वनी : ६९ ४१ ५७

बुक-पोस्ट

To, ____________________

____________________

____________________

द्वारा :
'प्रबोधन' गोरेगाव
'विद्युत', लो. टिळक नगर रस्ता क्र. ४,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव (पश्चिम),
मुंबई–४०० ०६२ ● दूरध्वनी : ६९ ४१ ५७